# कोरोना योध्यांना रोगप्रतिकारक गोळ्यांचे वाटप

## आजपावेतो दिड लाख गोळ्यांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ सप्टेंबर -**

कोरोना महामारीमध्ये खऱ्या अर्थाने रस्त्यावर उतरून काम करणाऱ्या कोरोना योध्यांना कोल्हापूर येथील श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर व किक हिल फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने नगरपालिका कर्मचारी, आशा वर्कस, पत्रकार यांना एक हजार रोगप्रतिकारक शक्ती वाढविणाऱ्या गोळ्याचे वितरण करण्यात आले.

प.पू.आनंदनाथ महाराज सांगवडेकर व राजवैद्य समीर जमदग्नी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभरात हा उपक्रम राबविला जात आहे. या अंतर्गत पोलीस, सफाई कर्मचारी, पत्रकार आदी दीड लाख कोरोना योध्यांना सदर आयुर्वेदिक गोळ्यांचे वाटप करण्यात आले आहे. कोरोनाला रोखण्यासाठी डॉक्टरांबरोबच पोलीस, सफाई कर्मचारी, आशा वर्कस, प्रशासकीय अधिकारी अहोरात्र काम करीत आहेत. त्यांची रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी सदर रस माधव वटी गोळ्या उपयुक्त ठरल्या आहेत.



या अंतर्गत पंढरपूर नगरपालिका कर्मचाऱ्यांना ८०० रस माधव वटीचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी अनिकेत मानोरकर, उपनगराध्यक्ष अनिल अभंगराव, डॉ.अमोल मोरे, डॉ.पुरुषोत्तम कोष्टी तसेच नगरपालिका आरोग्य विभागाचे शरद वाघमारे, तोडकर आदी उपस्थित होते.

यावेळी कोरोनासाठी कार्य करणाऱ्या संस्थेनी संपर्क करावा. त्यांच्या बाबत देखील सकारात्मक निर्णय घेवू असे आश्वासन दिले गेले.